बृहन्मुंबई महानगरपालिका

संकलित मूल्यमापन

प्रथम सत्र

२०१८

इयत्ता - चौथी  विषय - परिसर अभ्यास  गुण - ३०

प्रश्न १ अ. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा व वाक्ये पुन्हा लिहा (५)

(शिवनेरी, परिसरात, संस्कृतचे, सुरवंट, भोसले)

१. फुलपाखरांच्या अळीला ........ म्हणतात.
२. सजीवांच्या गरजा ........ पूर्ण होतात.
३. महाराष्ट्रातील शूर घराण्यांपैकी वेरूळचे ........ घराणे मोठे पराक्रमी निघाले.
४. शिवरायांचा जन्म ........ किल्ल्यावर झाला.
५. शहाजीराजे ........ गाढे पंडित होते.

ब. योग्य जोडया जुळवा. (५)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. सिंदखेडचे | अ) संत एकनाथ |
| २. पैठणचे | ब) संत ज्ञानेश्वर |
| ३. जावळीचे | क) जाधव |
| ४. आपेगाव | ड) निंबाळकर |
| ५. फलटणचे | इ) मोरे |

प्रश्न २ एका वाक्यात उत्तरे लिहा (५)

१. द्रावण कशास म्हणतात?
२. एखादयाला जुलाब व उलटया होऊ लागल्या तर तुम्ही घरच्या घरी कोणता प्रथम उपचार कराल?
३. जिजामातेच्या उपदेशाने शिवरायांच्या मनात कोणते विचार घोळू लागले?
४. शिवराय कोणकोणत्या विदया शिकले?
५. आपण कोणते पदार्थ कच्चे खातो? तीन पदार्थांची नावे लिहा

प्रश्न ३ अ. प्रत्येकी दोन-दोन नावे लिहा. (६)

१. वृक्षवासी प्राणी - (१) ........ (२) ........
२. तेल निघणारे पदार्थ - (१) ........ (२) ........
३. शिवरायांच्या किल्ल्यांची नावे (१) ........ (२) ........

Scanned by CamScanner

ब) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा. (५)

१. फळे गोड असतात कारण त्यांच्यात साखर असते.

२. अन्नपदार्थ खूप वेळ शिजवावेत.

३. पौष्टिकता टिकवायची असेल तर भाजी चिरुन मगच धुवावी.

४. शिवराय व मावळे यांनी रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य-स्थापनेची प्रतिज्ञा केली.

५. शिवरायांची मुद्रा संस्कृत भाषेत नव्हती.

---

प्रश्न ४ योग्य कारणे लिहा. (४)

१. सोडावॉटरच्या बाटलीचे झाकण काढले की वायुचे बुडबुडे फसफसून वर येतात.

२. स्वराज्याचे तोरण बांधण्यासाठी शिवरायांनी तोरणा किल्ल्याची निवड केली.

---

Scanned by CamScanner